**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडल कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. २२/२०१३ दि. ०७.०६.२०१३**

| | | |
|---|---|---|
| **हॉटेल विवेक**<br>**५४०-B-१, मेन रोड**<br>**माळ नाका,रत्नागिरी**<br>**ता./जि.रत्नागिरी** | } | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण,**<br>**विभागीय कार्यालय ,रत्नागिरी** | } | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | } | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष**<br>**२) श्री. व्ही.बी.जगताप ,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | } | **विशाल रमाकांत देसाई (भागीदार)**<br>**श्री. जयंत पुरुषोत्तम बिवलकर (प्रतिनिधी)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **श्री. ए.डब्लू. महाजन, कार्यकारी अभियंता**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी**<br>**श्री. एन. आर. बुकटे, कनिष्ठ अभियंता**<br>**रत्नागिरी शहर** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

हॉटेल विवेक ५४०-B-१ व्यापारी जोडणी ग्राहक क्रं.२१००१०२२५३५८ यांची तक्रार ०७.०६.२०१३ रोजी दाखल झाली असता मंचाकडील पत्र क्रं. १३० ११ जून २०१३ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यांचेकडून आवश्यक ते स्पष्टीकरण / खुलासा मागवण्यात आला. विभागीय कार्यालय रत्नागिरी यांच्याकडून आवश्यक ते स्पष्टीकरण विभागीय कार्यालयाकडील पत्र क्रं. ५१२०, २७ जुर्ले २०१३ च्या पत्रानुसार २५ जुर्ले २०१३ रोजी मंचाकडे प्राप्त झाले. आयोगाच्या नियमावलीनुसार नोटीस काढण्यात येवून १६ जुलै २०१३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली असता महावितरणकडून तहकुबी अर्ज आल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात येवून पुन्हा नोटीस देण्यात येवून ३० जुर्ले २०१३ रोजी सुनावणी घेण्यात आली असता उभयबाजूंनी उपस्थित राहून युक्तीवाद करण्यात आला तसेच अनुषंगिक कागदपत्रे आणि अन्य तपशीलही दाखल करण्यात आला.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की, रत्नागिरी येथील जुना माळनााका नगरपालिका इमारत क्रं. ५४०/ब १ मध्ये हॉटेल विवेक या नावाने व्यवसाय असून ५४०/ब या इमारतीत विवेक लॉजींग या नावाचा स्वतंत्र व्यवसाय आहे. प्रत्येक व्यवसायाच्या नावाने स्वतंत्र वीजजोडण्या घेण्यात आलेल्या आहेत. महावितरणकडून असलेल्या जोडण्यांचा विदयुत भार एकत्र करुन एकाच मीटरमधून वीजपूरवठा करण्याविषयी कळविण्यात आले असून स्वतंत्र जोडण्यांसाठी स्वतंत्र करपावती सादर करावी अशाीही मागणी करण्यात आली आहे. तथापि ही मागणी नियमबाहय असल्याने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दि. ७ मार्च २०१३ रोजी दाखल करण्यात आली असता कक्षाकडील आदेश क्रं. २७४८,६ मे २०१३ च्या आदेशानुसार आयोगाच्या नियमावलीचे कलम २.२.५ प्रमाणे तक्रार निकाली काढण्यात आली पण तक्रारीचे निवारण करण्यात आले नाही. अंतर्गत कक्षाने आमचे म्हणणे ऐकून न घेताच किंवा कोणतीही संधी न घेता एकतर्फी तक्रार फेटाळली की जी, नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या विरुध्द आहे. हॉटेल विवेक आणि विवेक लॉजीग या स्वतंत्र संस्था असून त्याचे काम कामकाज स्वतंत्र इमारती मधून केले जाते. अनुषंगिक कायदयाखाली स्वतंत्र नोंदणी असून याच इमारती मधून बँक ऑफ बडोदाचे ATM केंद्र आहे. अनेक वर्षे असलेला पान गादीचा व्यवसाय सध्दया बंद आहे. प्रत्येक अस्थापनेसाठी स्वतंत्र व्यवहार असून त्यानुसार वीजजोडण्या घेण्यात आल्या असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| ग्राहकाचे नाव | ग्राहक क्रमांक |
|---|---|
| अ) हॉटेल विवेक | २१००१०२२५३५८ |
| ब) विवेक लॉजिंग | |
| i) विवेक लॉजिंग (Bank of Baroda) A.T.M | २१००१००५५८५१ |
| ii) वंदना क. देसाई | २१००१००९१७८५ |
| iii)वंदना क. देसाई | २१००१००९१८१५ |
| iv) रमाकांत आ. देसाई | २१००१००९५७९९ |
| v)रमाकांत आ. देसाई (पान शॉप सध्या वापरात नाही) | २१००१००९५८०२ |

महावितरणने स्वतंत्र कर पावतीची केलेली मागणी आयोगाच्या विनिमय २००५ च्या कलम ३.४.३ शी विसंगत आहे. मा. विदयुत लोकपालाने तक्रार प्रकरण ७४/२०१० च्या आदेशात स्वतंत्र जोडणीसाठी स्वतंत्र आस्थापना हे मान्य केले आहे. महावितरणने अन्य कागदपत्रे याबाबतही कोणताच खुलासा केलेला नाही. आणि कायदयातील तरतुदी, आयोगाची नियमावली आणि वीज जोडण्याबाबतची सदय स्थिती विचारात घेता स्वतंत्र आस्थापनेला स्वतंत्र जोडणी या तत्त्वानुसार महावितरणने उचित कारवाई करावी. महावितरणच्या अवैध कृतीला मनाई करुन तक्रारीच्या अनुषंगाने अनुषंगिक आदेश देण्यात यावा.

तक्रारप्रकरणाची सुनावणी ३० जुर्ले २०१३ रोजी करण्यात आली असता ग्राहकाच्या वतीने विशाल रमाकांत देसाई भागीदार आणि ग्राहकाचे प्रतिनिधी या नात्याने जयंत पुरुषोत्तम बिवलकर उपस्थित राहून युक्तिवाद करण्यात आला. महावितरणच्या वतीने कार्यकारी अभियंता ए.डब्लू. महाजन विभागीय कार्यालय आणि एन. आर. बुकटे कनिष्ठ अभियंता रत्नागिरी शहर उपस्थित राहून युक्तीवाद करण्यात आला. उभयबाजूंनी तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक तो खुलासा आणि तत्सम कागदपत्रे दाखल करण्यात आली. मंचाच्या सुचनेनुसार ग्राहकाकडून अधिक तपशीलही ०२.०८.२०१३ रोजी दाखल करण्यात आला.

तक्रारप्रकरणाच्या सुनावणीत ग्राहकाच्या वतीने लेखी म्हणणे आवश्यक त्या तपशीलासह दाखल करण्यात येवून स्पष्ट करण्यात आले की, हॉटेल विवेक ही स्वतंत्र आस्थापना असून भागीदारी आणि अनुषंगिक कायदयाखाली रजिस्ट्रेशनही झाले आहे.एकाच वास्तुमध्ये अनेक आस्थापना असू नयेत अशी कोणतीही तरतूद अधिनियम / विनिमयात नाही. करपावतीचा कोणताही आधार नाही. स्वतंत्र करपावती देण्याची आवश्यकता नसल्याने ती दाखल करण्यात आलेली नाही. विविध ग्राहक क्रमांकाच्या जोडण्यामधून वीज वापर कसा होतो याविषयी कार्यकारी अभियंताचा आक्षेप चुकीचा आहे. तथापि ग्राहक क्रं. १७८५ या जोडणीमधून होणारा वीजपुरवठा आस्थापनाशी संबंधित व्यवसायासाठी वापरला जातो आणि त्या जोडण्याचे ग्राहक क्रं. ५३५८ मध्ये एकत्रिकरण करण्यास आमची हरकत नाही. वाणिज्य परिपत्रक क्रं. ११० व १२३ ही प्रामुख्याने निवासी आणि व्यापारी संकुलातील सामाईक सुविधासाठी उदा. लिफ्ट,पाण्याचा पंप इत्यादीसाठी करावयाच्या वीज पुरवठयासंबंधी आहेत,आणि प्रस्तुत तक्रार प्रकरणाला ती लागू होत नाही. इमारतीतील गाळयांच्या करपावत्या दाखल केल्या नाहीत, म्हणून मालकी एकाच व्यक्तीची आहे. हा महावितरणचा निष्कर्ष चुकीचा असून जागेची /इमारतीची मालकी हा निकष नसून आस्थापना हा निकष महत्त्वाचा असून कायदयालाही तो अभिप्रेत आहे. नियामक आयोगाच्या नियमावलीनुसारही स्वतंत्र आस्थापना हा निकष महत्त्वाचा आहे. अनुषंगिक कायदयानुसारही स्वतंत्र रजिस्ट्रेशन वेगवेगळया आस्थापनेकरता असल्याने आस्थापनेच्या अस्तित्वानुसार स्वतंत्र मीटर आवश्यक असून कायदयातील तरतूदी आणि विनिमयात तरतूद नसताना सध्याच्या मीटरचे एकत्रिकरण करणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. महावितरणची ही कृती तरतूदींचे उल्लंघन करणारे असून मंचाने यास प्रतिबंध करावा आणि योग्य ते आदेश दयावेत.

महावितरणने आपल्या युक्तीवादात स्पष्ट केले की, २८.०१.२०१३ रोजी उपविभाग शहरकार्यालयाकडून झालेल्या तपासणीत हॉटेल विवेक माळनाका रत्नागिरी यांच्या इमल्याकरता व्यापारी वर्गवारी असलेल्या ६ स्वतंत्र वीजजोडण्या आढळून आल्या. सदर वीजजोडण्या हॉटेल,लॉजिंग तसेच तत्सम व्यवसायाकरता वापरात असून विदयूत पुरवठा सहीता व वीज पुरवठयाच्या अटीमधील तरतूदीनुसार महावितरण कंपनीने ग्राहकास एकाच ठिकाणी एका वर्गवारीची दोन किंवा अधिक वीजजोडण्या न देण्याबाबत तरतूद केलेली आहे. ग्राहकाकडून स्वतंत्र आस्थापनेविषयी ८ अ चा उतारा तसेच करपावत्या सादर करण्यात आलेल्या नाहीत. ग्राहकाकडे असलेल्या वीजजोडण्याचा तपशील खालीलप्रमाणे असून

| अ क्रं | ग्राहकाचे नाव | ग्राहक क्रमांक | वापरावयाचे प्रयोजन |
|---|---|---|---|
| १ | हॉटेल विवेक | २१००१०२२५३५८ | रेस्टॉरंट आणि परमिट रुम |
| २ | देसाई रमाकांत आत्माराम | २१००१००९५८०२ | रेस्टॉरंट |
| ३ | देसाई रमाकांत आत्माराम | २१००१००९५७९९ | रेस्टॉरंट |
| ४ | देसाई वंदना कमलाकर | २१००१००९१८१५ | ATM |
| ५ | देसाई वंदना कमलाकर | २१००१००९१७८५ | लॉजींग |
| ६ | मॅनेजर विवेक लॉज | २१००१००५५८५१ | लॉजींग |

प्रत्यक्षपाहणीमध्ये सर्वच वीजवापर हा वाणिज्य कारणासाठी होतो आहे. आणि म्हणूनच महावितरणच्या Conditions of Supply २.२.५ नुसार अधिक वीजजोडण्या देता येत नाहीत. तसेच महावितरण कडील परिपत्रक क्रं.११० आणि १२३ परिपत्रकानुसार एकाच इमारतीमध्ये एकाच कारणासाठी (घरगुती, वाणिज्यक) तर अशा ठिकाणी वेगवेगळया वीजजोडण्या देण्यात येवू नयेत,आणि त्या दिल्या गेल्या असल्यास एकत्र करुन एकाच मीटरवरुन सप्लाय देण्यात यावा. इमारतीतील गाळे वेगवेगळया नावावर असतील तर प्रत्येकाची टॅक्स पावती व असेसमेंट उतारा दाखल करणे आवश्यक आहे. सदरहू इमारत एकाच व्यक्तीच्या मालकीची असून या इमारतीतील गाळे हे लॉजिंग, बोंर्डीग रुम, परमिट रुम या एकाच कारणाकरता होतो. म्हणजेच हॉटेल व्यवसाय ही एकच आस्थापना आहे. मंचाने ही वस्तुस्थिती विचारात घेवून ग्राहकाचा अर्ज फेटाळण्यात यावा आणि इमारतीमध्ये एकाच कारणाकरता हॉटेल व्यवसायातील वेगवेगळया वीजजोडण्या काढून ते एकत्रित करुन एकाच मीटरवरुन देण्याची परवानगी देण्यात यावी. प्रत्यक्ष पाहणीत सहा मीटरर्स वेगळी असली तरी त्यांचा वापर ATM आणि पान शॉर्प सोडून एकाच कारणाकरता केला जातो आणि म्हणूनच मीटरर्स एकत्रित करण्याची गरज आहे. व्यापारी कारण एकच असल्याने मीटर एकत्रित करणे नियमानुसार आहे. आणि याबाबतीत महावितरणने कोणतीही बेकायदेशीर कृती केलेली नाही.

तक्रारप्रकरणात उभय बाजूनी केलेला युक्तीवाद, दाखल करण्यात आलेली कागदपत्रे अनुषंगिक वस्तुस्थिती व सर्व तांत्रिक बाबीचा विचार करता ग्राहकाची तक्रार रास्त असून दाखल केलेल्या पुराव्यानुसार 'स्वतंत्र आस्थापना' सिद्ध झालेल्या आहेत. एकाच इमारतीत अनेक व्यवसाय असू नयेत असा कोणताही नियम नाही. एकाच इमारतीत वेगवेगळया आस्थापना असल्याने 'आस्थापना' या नात्याने आयकर कायदा,भागीदारी कायदा,सेवा कर कायदा,सेल्स टॅक्स आणि Shop Establishment इत्यादी कायदयाखालील तरतुदीनुसार स्वतंत्र नोंदणी झालेली आहे. स्वतंत्र नोंदणी नुसार व्यवसायाचे स्वरुप एकच नसून ते लॉजिंग,रेस्टॉरंट,परमिटरुम या वेगवेगळया कारणाकरता चालवीले जाते. संबंधीत वीजजोडण्या आस्थापनाच्या नावे असून अधिनियमातील तरतुदीनुसारच दिल्या गेल्या आहेत. तक्रारप्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता हॉटेल विवेक ही आस्थापना भागीदारी फर्म असून त्याकरता 'स्वतंत्र आस्थापना' अस्तित्वात असून याचा इमला क्रमांक ५४०/ब/१ असा आहे. सदरहू भागीदारी संस्थेला हॉटेल विवेक हे नाव असून याचा वीज ग्राहक क्रं. २१००१०२२५३५८ असा असून भागीदार रमाकांत आ. देसाई आणि भागीदार सौ. वंदना क. देसाई यांच्या नाचे असलेल्या २१००१००९५७९९ व २११००९१७८५ यातून वीज पुरवठा घेतला जातो. कागदपत्राच्या तपशीलानुसार ही नोंदणीकृत भागीदारी संस्था आहे. विवेक लॉजींग या नावाची स्वतंत्र 'आस्थापना' असून त्याचा व्यवसाय स्वतंत्रपणे इमला क्रं. ५४०/ब मधून चालविला जातो. सदरहू वीज ग्राहकाला मीटर भागीदार सौ. वंदना क. देसाई यांच्या नावे आहे. लॉजीग करता अन्य कायदयाखालील आवश्यक त्या परवानग्या आणि नोंदणी झालेली आहे. भागीदारी संस्था या नात्याने याचे सुध्दा स्वतंत्र अस्तित्व असून व्यवसाय स्वतंत्रपणे केला जातो. कायदयातील तरतुदीचा अभिप्रेत असलेले स्वतंत्र आस्थापना आणि आस्थापनेच्या सर्व अटी याचे या ठिकाणी पालन झालेले आहे. याव्यतिरिक्त रमाकांत आ देसाई

या नावे क्रं. २१००१००९५८०२ पान शॉप करता स्वतंत्र जोडणी आहे. तथापि ही जोडणी वैयक्तिक नावाने आहे. त्याचा भागीदारीशी संबंध नाही. या जोडणीबाबत करण्यात येणारा वापर हा पानशॉप करता असून त्याचे दरमहा भाडे घेतले जाते. ग्राहकाने कळविल्यानूसार हा व्यवसाय सध्या बंद आहे. या व्यतिरिक्त ग्राहक क्रं. २१००१००५५८५१ ATM करता असून त्याचा करार सौ. वंदना कमलाकर देसाई आणि रमाकांत आत्माराम देसाई या उभयतांनी बॅक ऑफ बडोदाशी केला असून त्याचा कालावधी १० वर्षाचा म्हणजेच ०१.०९.२००६ पासून ३१.०८.२०१६ पर्यंतचा आहे. स्वतंत्र Lease Deed मंचाकडे दाखल करण्यात आले असून आवश्यक ती अन्य कागदपत्रे त्यासोबत जोडलेली आहेत. सदरहू करारानूसार ही सुध्दा स्वतंत्र आस्थापना असून याचा वापरही व्यापारी कारणाकरता केला जातो. या प्रकरणातील वरील तपशील आणि अन्य अनुषंगिक तांत्रिक बाबी विचारात घेता स्वतंत्र आस्थापनेच्या निकष यामध्ये पूर्ण झालेला दिसतो. वीज विधेयकातील कलम ४३(२) नुसारही एका जागेत एकापेक्षा अधिक जोडण्या देण्यास प्रतिबंध नाही. या अनुषंगानेच नियामक आयोगाच्या (विदयुत पुरवठा संहीता व पुरवठयाच्या अन्य अटी) विनिमय २००५ च्या कलम ३.४.३ नुसार प्रत्येक स्वतंत्र आस्थापनेय स्वतंत्र वीजपुरवठा देण्याबद्दल उल्लेख आहृे एकाच वर्गवारीतील अनेक जोडण्या हे कायदयाला अभिप्रेत नाही. कायदयातील तरतुदीनुसार "स्वतंत्र जागा" हा निकष महत्तवाचा नसून कायदयातील तरतुदीना "स्वतंत्र आस्थापना"हा निकष मान्य आहे. मा.विदयुत लोकपालांनी सुध्दा त्यांचाकडील तक्रार क्रं. ७४/२०१० प्रकरणी स्वतंत्र आस्थापनेचा मुद्दा अधिक स्पष्ट केला आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता ग्राहकाने केलेली मागणी रास्त असून स्वतंत्र आस्थापनेस स्वतंत्र जोडणी देणे महावितरणवर बंधनकारक आहे. ग्राहकानेच सूचित केल्यानुसार ग्राहक क्रं. २१००१०२२५३५८ ,२१००१००९१७८५ आणि २१००१००९५७९९ याच्या एकत्रीकरणास हरकत नाही. ग्राहकाची ही मागणी नियमानुसार असून सदरहू मीटरचे एकत्रिकरण होऊ शकते. असेच मंचाचे मत आहे. याव्यतिरिक्त अन्य आस्थापना स्वतंत्र असल्याने त्यांच्या मीटरचे एकत्रीकरण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. महावितरणने दाखल केलेली परिपत्रके क्रं. ११० आणि १२३ ही निवासी आणि व्यापारी संकुलातील सामाईक सुविधासाठी असल्याने तक्रारप्रकरणातील वस्तुस्थितीला लागू होत नाही. महावितरणचे अन्य आक्षेप कायदयातील तरतुदी आणि आयोगाच्या नियमावलीशी सुसंगत नसल्याने त्या फेटाळणेच योग्य ठरेल. वीजविधेयकातील तरतुदीनुसार आणि आयोगाच्या नियमावलीनुसार स्वतंत्र आस्थापना हा निकष ग्राहकाने पूर्ण केला असल्याने तसेच वीजपुरवठया बाबतीत अन्य अटी / शर्थी इत्यादींची पूर्तता झालेली असल्याने महावितरणची एकत्रीकरणाची कृती अवैध असून ती रद्दबातल करण्यात येत आहे. मंचाच्या या वरील निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत असून तो महावितरणवर बंधनकारक राहील.

## आदेश

**१) ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात आली असून स्वतंत्र आस्थापनेस स्वतंत्र जोडणी या नियमानुसार महावितरणला आदेश देण्यात येत आहे कि, वीजजोडणी क्रं.२१००१००९५७९९ व २१००१००९१७८५ यांचे विलिनीकरण वीजजोडणी क्रं. २१००१०२२५३५८ मध्ये करण्यात यावे. व वीजजोडणी क्रं. २१००१००५५८५१ , २१००१००९१८१५ व २१००१००९५८०२ यांचे अस्तित्व स्वतंत्र ठेवण्यात येवून त्यानुसार देयके अदा करण्यात यावीत.**

**२) या आदेशाची कार्यवाही ३१ ऑगस्टपर्यंत करण्यात येवून ५ सप्टेंबर २०१३ पर्यंत पूर्तता अहवाल महावितरणने मंचाकडे दाखल करावा.**

३) तक्रारप्रकरणातील खर्च व अनुषंगिक बाबी बाबत कोणताही आदेश नाही.

४) या आदेशाविरुध्द ग्राहकास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.

**<u>पत्ता :-</u>**

सचिव,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६/६०८,केशवा,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,मुंबई ४०००५१
फोन नं. ०२२ - २६५२९६५

| | | |
|---|---|---|
| श्री. डी. एस्. जामखेडकर | श्री. व्हि.बी.जगताप | श्री.एन्.ए.कुलकर्णी |
| अध्यक्ष | सचिव / कार्यकारी अभियंता | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- १३.०८.२०१३
ठिकाण :- रत्नागिरी